ता. खेड, जि. रत्नागिरी यांना मुदतीत सादर करावा. गुन्ह्याचा ...

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी **P.S.(ठाणे):** खेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0014 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/01/2024 04:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Date From (दिनांक पासून):** 11/01/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/01/2024
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Time From (वेळेपासून):** 12:10 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:56 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/01/2024 **Time (वेळ):** 03:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/01/2024 03:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुरुष प्रसाधन गह येथे तहसिलद,तहसिलदार कार्यालय खेड ता खेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**

(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with ACE Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कैलास पांडुरंग शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1972

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा कोंडीवली, शिंदेवाडी ता खे,खेड,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा कोंडीवली, शिंदेवाडी ता खे,खेड,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. चंपालाल महाजन डेडवाल | | | 1. महसुल सहाय्यक तहसिलदार कार्याल,रा शिवशक्ती अपार्टमेन्ट फ्लट,शिवतर रोड ता खेड जि रत्नागिर,खेड,रत्नागिरी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | मागणी केलेली लाच | 3,000.00 |



Scanned with ACE Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम3000/ स्वीकारलेली लाच रक्कम3000/ | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 12 /01/2024

मी कैलास पांडुरंग शिंदे, वय 52वर्षे, रा. कोंडीवली, शिंदेवाडी ता. खेड जि. रत्नागिरी मो. नं. 7666365477 समक्ष फिर्याद नोंदवुन देतो की,

मी वरील ठिकाणी राहणारा आहे. माझा चुलत भाऊ श्री. संजय शिंदे, पुतण्या श्री. महेंद्र शिंदे व मी असे आम्हा तिघांविरुध्द खेड पोलीस ठाणे येथे एनसी दाखल करण्यात आली होती. नमुद एनसी मध्ये प्रतिबंधक कारवाई म्हणुन आम्हा तिघांविरुध्द तहसीलदार खेड यांचेकडे चॅप्टर केस दाखल करण्यात आलेली आहे. दिनांक 10/11/2023 रोजी चॅप्टर केसची नेमली तारीख असल्याने मी, भाऊ संजय व पुतण्या महेंद्र असे आम्ही तारखेकरीता तहसीलदार कार्यालय खेड या ठिकाणी हजर होतो. त्यावेळी चॅप्टर केसचे काम पाहणारे संबंधीत क्लार्क श्री. चंपालाल डेडवाल यांनी आमची चॅप्टर केस मिटविण्याकरीता माझ्याकडे 3000/-रुपये रक्कमेची मागणी केली होती. डेडवाल यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची खात्री झाल्याने व त्यांना मला लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दिनांक 27/12/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय रत्नागिरी येथील पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांना त्यांच्या मोबाईलद्वारे संपर्क करुन लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे कळविले होते. त्यानुसार आमच्या केसची पुढील नेमली तारीख ही दिनांक 28/12/2023 रोजी असल्याने त्याप्रमाणे दिनांक 28/12/2023 रोजी सकाळी 10.30 वाजताचे सुमारास मौजे भोस्ते येथील निर्जनस्थळी पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांची भेट घेतली. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी माझी, पंच व लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील कर्मचारी यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगुन, वरील हकिकतीप्रमाणे स्वःहस्तक्षरातील माझा तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांचे समक्ष हजर केला. पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला व पंचांनी माझा तक्रारी अर्ज वाचुन त्यावर सहया केल्या. तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी ताब्यात घेतला.

त्यानंतर मी लोकसेवक डेडवाल हे तहसीलदार कार्यालय खेड येथे भेटतील असे पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांना सांगितले. त्यामुळे तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मला पंचासह तहसीलदार कार्यालय खेड येथे पाठवणार असल्याचे व भेटीदरम्यान माझे व लोकसेवक डेडवाल यांचेतील संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री.मुल्ला यांनी मला व पंचाना सांगितले. पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व नवीन सीलबंद मेमरी कार्ड हजर केले. त्यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये मेमरी कार्ड घालुन त्यामध्ये अगोदरचे काहीही संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले नाही याबाबत पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले. पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी मला व पंच तटकरी यांना लोकसेवक डेडवाल यांची भेट झाल्यानंतर भोस्ते येथे निर्जनस्थळी परत येण्याच्या सुचना दिल्या. तसेच त्यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे जॅकेटच्या आत टीशर्टमध्ये लपविला. ती वेळ 11.30 वाजताची होती. माझे कडील मोटार सायकल नंबर एमएच 08 यु 6110 या वाहनाने मी, पंच तटकरी यांचेसह पडताळणी कामी लोकसेवक डेडवाल यांची भेट घेण्याकरीता तहसीलदार कार्यालय खेड या ठिकाणी पोहचलो. मी तहसीलदार कार्यालया जवळ वाहन पार्क करुन तहसीलदार कार्यालयात



Scanned with ACE Scanner

गेलो. माझे मागोमाग पंच तटकरी देखील कार्यालयात आले.
तहसीलदार कार्यालयात गेल्यानंतर मी लोकसेवक डेडवाल यांना नमस्कार साहेब असे म्हणुन तारीख आहे ना असे विचारले...त्यावेळी लोकसेवक डेडवाल यांचे समोर चॅप्टर केसमधील माझा भाऊ संजय व पुतण्या महेंद्र व इतर लोक उपस्थित होते. त्यानंतर लोकसेवक डेडवाल, मी व इतर सहकारी यांचेमध्ये चॅप्टर केस संबधित बोलणे चालु होते. त्या दरम्यान आम्ही चॅप्टर केस मिटवण्याबाबत बोलत होतो. दरम्यान लोकसेवक डेडवाल यांनी मला, माझा भाऊ व पुतण्या यांना सहया करण्यास सांगितले त्याप्रमाणे आम्ही सहया केल्या. सहया केलेले कागद लोकसेवक डेडवाल यांनी ताब्यात घेतले. त्यावेळी मी, साहेब बघा काय तरी... असे लोकसेवक डेडवाल यांना सांगितले. त्यावेळी लोकसेवक डेडवाल यांनी, माझ्या हातात नाही साहेबांना विचारुन बघतो... असे सांगितले व साहेबांकडे निघुन गेले. त्यावेळी पुतण्या महेंद्र व भाऊ संजय असे कार्यालयातुन बाहेर जावुन थांबले. काही वेळाने लोकसेवक डेडवाल परत त्यांचे टेबल जवळ आले व त्यांनी पुढील चार तारीख दिली आहे असे सांगितले. त्यानंतर मी, काय मग... आता काय... असे विचारले असता लोकसेवक डेडवाल यांनी हाताच्या बोटाने पैषाबाबत खुणवुन किती... किती म्हणता असे विचारले व मी बोलतो साहेबांना असे सांगितले. त्यावेळी मी, तुम्ही बोला मग तसं सांगतो मी पोरग्याला... तुमचा व्यवहार मला कसं माहीत असे सांगितले. त्यावर लोकसेवक डेडवाल यांनी तीन पर्यंत देता का मग असे विचारले त्यावेळी मी, कमी करा काय तरी... असे सांगितले असता लोकसेवक डेडवाल यांनी मुश्कील आहे....वॉरंट काढणं चालु होतं असे सांगितले. त्यानंतर मी, त्याला चार तारखेला यायला नको ना....असे विचारले असता लोकसेवक डेडवाल यांनी नको असे सांगितले. त्यावेळी मी, चार तारखेला देतो....असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक डेडवाल यांनी नाही आज करत असाल तर.... आज होत असेल तर... नायतर मग चार तारखेलाच बघु सगळं... त्याला घेवुन या... साहेबांकडे घेवुन जाऊ... असे सांगितले असता मी, ठिक आहे साहेब असे बोललो व कार्यालयातुन बाहेर निघुन आलो. पंच तटकरी माझे मागोमाग कार्यालयाचे बाहेर येवुन मी व पंच तटकरी मोटारसायकलने पडताळणी पथक थांबुन असलेल्या भोस्ते येथील निर्जनस्थळी परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी माझे जवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. ती वेळ 13.05 वा. होती. पोलीस निरीक्षक श्री मुल्ला यांनी मला घडलेली हकीकत विचारली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी शासकीय वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, स्पिकर ऑन केला. त्यावेळी मी, पंच, पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला व पडताळणी पथकाने त्यातील संभाशण ऐकले. त्यावेळी मी माझा, भाऊ संजय शिंदे, पुतण्या महेन्द्र शिंदे व लोकसेवक डेडवाल यांचा आवाज ओळखला. सदर पडताळणीमध्ये लोकसेवक डेडवाल यांनी आमचे विरुध्द तहसीलदार कार्यालय खेड येथे सुरु असलेली चॅप्टर केस मिटवुन देतो असे सांगून माझ्याकडे 3,000/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केले आहे. तसेच आमचे चॅप्टर केसची पुढील नेमली तारीख ही दिनांक 04/01/2024 रोजीची असुन लाच रक्कम 3,000/- रुपये चार तारखेला देणार असल्याचे मी लोकसेवक डेडवाल यांना सांगितले असता, प्रथमदर्षनी लोकसेवक डेडवाल यांनी लाच रक्कम त्याचवेळी घेवुन येण्यास सांगितली परंतु त्यानंतर चार तारखेलाच बघु सगळं असे सांगुन दिनांक 04/01/2024 रोजी लाच रक्कम स्विकारणार असल्याचे मान्य केल्याचे समक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाशणामध्ये आढळुन आले आहे. त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करुन पुढील सापळा कारवाई दिनांक 04/01/2024 रोजी करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी मला, आम्हा पंचास व पडताळणी पथकास सांगितले.

दिनांक 04/01/2024 रोजी मी माझे वैयक्तिक कामासाठी बाहेरगावी जाणार असल्याचे पोनि मुल्ला यांना कळविले होते. त्यादिवशी मी तहसीलदार कार्यालय खेड येथे तारखेकरीता हजर राहीलो नव्हतो. त्यादिवशी चॅप्टर केसची पुढील नेमली तारीख ही दिनांक 11/01/2024 रोजी असल्याबाबत मला माझा भाऊ संजय यांचेकडुन समजले होते त्याप्रमाणे मी पोलीस निरीक्षक मुल्ला यांना कळविले होते. त्यानुसार मी दिनांक 11/01/2024 रोजी मौजे भोस्ते येथे निर्जनस्थळी पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांची भेट घेतली. त्यावेळी तहसीलदार कार्यालय खेड येथे पंचासह पाठवुन पुढील सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी मला, पंच व अॅसीबी स्टाफ यांना सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी सापळा पुर्व कार्यवाही येथे पुर्ण करुन, सापळा कारवाई पुढे चालु करण्यात येईल असे सांगितले.

पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांचे सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये 3,000/- (रुपये तीन हजार) (500/- रुपये दराच्या 6 भारतीय चलनी नोटा) हजर केली. पोलीस निरीक्षक श्री मुल्ला यांच्या सुचनेवरून पंच तटकरी यांनी माझी अंगझडती घेतली. माझे अंगझडतीत मिळुन आलेल्या वीजजवस्तु व रोख रक्कम मला परत करण्यात आल्या. पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी शासकीय वाहनात मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अॅन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये



Scanned with ACE Scanner

अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या वस्तूवर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर षासकीय वाहनामध्ये काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविल्या त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या.
पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांच्या सूचनेवरून पोलीस हवालदार कोळेकर यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व त्या नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविल्या असता नोटांवर अगर त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर अॅन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर शासकीय वाहनामध्ये काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधार करून पोलीस हवालदार कोळेकर यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोलीस हवालदार कोळेकर यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर उजेड करण्यात आला. पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांच्या सूचनेवरून पोलीस हवालदार कोळेकर यांनी त्या नोटांची घडी करुन माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिषात ठेवली. त्यावेळी मला पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी सूचना दिली की, लोकसेवक डेडवाल यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तो पर्यंत मी सदर नोटांना हात लावू नये असे सांगितले.
सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री मुल्ला यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी लोकसेवक डेडवाल यांना लाच रक्कम देण्यासाठी भेट घेईन त्यावेळी आमचेतील होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुल्ला यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे निवेदन डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केले. सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आत बनियन मध्ये लपविला. ती वेळ 12.10 वाजताची होती. त्यानंतर मी व पंच तटकरी असे मोटारसायकलने लोकसेवक डेडवाल यांची भेट घेण्यासाठी तहसीलदार कार्यालय खेड येथे पोहोचलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच जडयाळ असे शासकीय वाहनाने सदर ठिकाणी आले.
मी व पंच तटकरी असे तहसीलदार कार्यालयाच्या समोरील मोकळ्या जागेत गाडी पार्क करुन तहसीलदार कार्यालयातील महसुल शाखेमध्ये गेलो. त्यावेळी पंच तटकरी हे मागोमाग तहसीलदार कार्यालयात जावुन महसुल शाखेच्या बाहेर दरवाजा जवळ थांबुन होते. त्यावेळी महसुल शाखेमध्ये लोकसेवक डेडवाल यांचे टेबल जवळ माझा भ

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Nitin Pandurang Bhoyar(I (Inspector)) / DGPNPBM7303 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with ACE Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Nitin Pandurang Bhc
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPNPBM7303

पोलीस स्टेशन ऑफिसर
खेड,पोलीस ठाणे (रत्नागिरी)



Scanned with ACE Scanner